आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – दु. 3.00 वाजता
**4**, ऑगस्ट 2020 **–** मंगळवार

**ठळक बातम्या**

- मुंबईत पावसाचा जोर कमी झाल्यामुळं पाणी ओसरू लागलं, वाहतूक व्यवस्था मात्र अजूनही विस्कळीत
- कोकणात सावित्री, कुंडलिका आणि जगबुडी नदीनं धोक्याची पातळी ओलांडली, नदीकाठच्या नागरिकांना खबरदारीचा इशारा
- राज्य सरकारकडून साडेपाचशे कोटी रुपये मिळणार असल्यानं एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा
- देशातले सव्वा बारा लाखाहून अधिक कोरोनाग्रस्त बरे होऊन गेले घरी
- युपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेचा निकाल जाहीर

**<><><><><>**

मुंबईत रात्रभर पाऊस कोसळत असून मुंबईच्या सखल भागात पाणी भरल्यानं वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. मुंबईच्या तिन्ही मार्गावरची लोकल सेवा काही काळासाठी बंद करण्यात आली होती. अनेक ठिकाणी पाणी साचल्यानं बेस्टनंही काही गाड्यांचे मार्ग बदलले होते. मध्य रेल्वेनं लांब पल्ल्याच्या काही गाड्यांच्या वेळा बदलल्या आहेत.

हिंदमाता, दादर टिटी, कुर्ला, माटुंगा, गव्हाणपाडा, चेंबूर,अंधेरी अग्निशमन केंद्र, वर्सोवा, दहिसर, बोरिवली, धारावी, वरळी, कांदिवली आदी ठिकाणी पाणी भरलं आहे. कुर्ल्यातल्या नेहरू नगरात, गोरेगावच्या मोतीलाल नगरात घरांमधे पाणी शिरलं आहे. सबवेमधे पाणी भरले आहे. पुराच्या पाण्यात गाड्या बंद पडल्या आहेत. ठिकठिकाणी पाणी भरल्यानं दादर हिंदमाता, किंग्ज सर्कल, प्रतिक्षनगर, चेंबूर नाका, बांद्रा, सायन आधी भागातील वाहतूक दुसऱ्या मार्गा**नं** वळवली आहे.

मिठी आणि पोयसर नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे, त्यामुळे नदीलगतच्या वस्त्यांमधल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे. मुंबई महापालिका आयुक्त इक्बाल चहल यांनी आज पालिका क्षेत्रातल्या मिलन सबवे, वांद्रे पूर्व आदि भागांना भेटी देऊन परिस्थितीची पाहणी केली**.** गेल्या चोवीस तासात कुलाबा **इथं 252** मिलिमीटर आणि सांताक्रुझ **इथं 268** मिलिमीटर इतक्या पावसाची नोंद झाली आहे.

मुंबई शहर आणि उपनगरात आज मुसळधार पर्जन्यवृष्टीची शक्यता आहे. मुंबईच्या हवामान विभागाचे उप महासंचालक कृष्णानंद होसाळीकर यांनी याबाबत माहिती दिली

**होल्ड- बाईट....**

या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, समुद्रकिनारे तसंच पाणी भरलेल्या ठिकाणापासून लांब राहावं, असं आवाहन पालिकेनं केलं आहे. राज्य सरकारनं मंत्रालयासह शासकीय कार्यालयांना सुट्टी दिली आहे.

आज संध्याकाळी **6** वाजून **55** मिनिटांनी समुद्राला भर्ती येणार असून सुमारे दीड मीटर ऊंचीच्या लाटा उसळतील. मध्यरात्रीनंतर पाऊणच्या सुमाराला मोठी भरती येणार असून सुमारे **4** मीटर उंच लाटा उसळण्याची शक्यता आहे. उद्या संध्याकाळी पुन्हा छोटी भरती येणार असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.

दुपारनंतर पावसाचा जोर कमी झाला असून, ठिकठिकाणी साचलेलं पाणीही ओसरत आहे**.** पाण्याची पातळी ओसरु लागल्यानं पश्चिम रेल्वेन दुपारी बाराच्या सुमाराला उपनगरी सेवा सुरु केली.

**<><><><><>**

**पालघर** जिल्ह्यात आज सकाळपासून बोईसर, धनानीनगर, पालघर , सातपाटी, डहाणू, बोर्डी, चिखले, विक्रमगड, वसई - विरार, नालासोपारा या भागांत पावसानं जोरदार वाऱ्यांसह हजेरी लावली आहे. तर वाडा, जव्हार या भागांत अधून मधून रिमझिम पाऊस होत आहे. सकाळपासून मुसळधार होतं असल्यानं नाले आदी भरून वाहत असून अनेक ठिकाणच्या सखल भागांत रस्त्यांवर पाणी साचलं आहे. वसई आणि विरार इथं रस्त्यावर झाड उन्मळून पडण्याच्या घटना **झा**ल्या आहेत**.** दोन महिन्यानंतर काल पासून पावसानं जिल्ह्यातल्या अनेक भागांत चांगली हजेरी लावली आहे. त्यामुळे चिंतेत आलेल्या बळीराजाही सुखावला आहे.

**रायगड** जिल्ह्यात काल रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. आता पावसाचा जोर कमी झाला असला तरी जिल्ह्यातल्या सावित्री, आंबा, कुंडलिका, पाताळगंगा, उल्हास या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. सावित्री आणि कुंडलिका नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. सावित्री नदीच्या आसपासच्या परिसरातील नागरिकांना जिल्हा प्रशासनानं सतर्कतेचा दिला आहे. पु**ढच्या** ४८ तासात रायगडसह कोकणात मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली असून रायगड जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात काल रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. रत्नागिरी तालुक्यातल्या काजळी नदीला आलेल्या पुरामुळे चांदेराई बाजारपेठेत पाणी भरलं, त्यामुळे व्यापाऱ्यांची तारांबळ उडाली. रत्नागिरी शहरासह जिल्ह्यातल्या अनेक सखल भागांमध्ये पाणी साचलं असून अनेक भागात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, रत्नागिरी जिल्हातल्या खेड इथल्या जगबुडी नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात कालपासून पावसान जोर धरलाय. जिल्ह्यात सगळीकडेच मुसळधार पाऊस पडतोय. काल रात्री पासून पावसाचा आणि वाऱ्याचा जोर वाढला आहे. त्यामुळे पडझडीच्या घटना **झा**ल्या आहेत. सखल भागात पाणी साचलं आहे. झाडं पडून काही ठिकाणचा वीज पुरवठा **खंडित** आहे. रस्त्यावर झाड पडल्यानं वाहतुकसुद्धा ठप्प झाली आहे.

सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासात जिल्ह्यात ११२ मिलीमीटर च्या सरासरीने ८९९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पाऊस सावंतवाडी तालुक्यात १४० मिलिमीटर एवढा पडला. जिल्ह्यात दोडामार्ग, वेंगुर्ले, कुडाळ या तालुक्यात पावसानं गेल्या २४ तासात शंभरी ओलांडली. आतापर्यंत जिल्ह्यात एकूण २ हजार ८१० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

**सातारा** जिल्ह्याच्या विविध भागात रात्री पासून जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे**.**

**सांगली** जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडत आहे. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही विभागात हा पाऊस कोसळ**त** आहे. सांगली जिल्ह्या**तल्या** चांदोली परिसरात अतिवृष्टी झाली. गेल्या **24** तासात इथ **70** मिलिमिटर पाऊसाची नोंद झाली. चांदोली इथली वीज निर्मिती पूर्णतः बंद आहे. त्यामुळे नदी पात्रात पाण्याचा विसर्ग ही बंद आहे. गेली पंधरा दिवस पावसा**नं** ओढ दिल्या**नं** खरीप पिकांना धोका निर्माण झाला होता. मात्र आज सकाळपासून पावसा**नं** दमदार सुरुवात केली. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना त्यामुळे दिलासा मिळाला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचं थकलेलं वेतन लवकरच दिलं जाईल अशी माहिती परिवहन मंत्री परब यांनी ट्विटरवरून दिली आहे. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मे महिन्यात केवळ पन्नास टक्के वेतन दिलं होतं, तसंच जून महिन्याचं वेतन अजूनही मिळालेलं नाही. यासंदर्भात आज उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ५५० कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती परब यांनी ट्विटरवरून दिली आहे.

**<><><><><>**

अभिनेता सुशांतसिंग राजपूत याच्या आत्महत्या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी अशी शिफारस बिहार राज्य सरकारनं केली आहे. सुशांतसिंग याच्या वडिलांनी सीबीआय चौकशीची मागणी केली होती, त्याआधारे ही शिफारस केली असल्याचं बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यादव यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली **2014** मधे केंद्रात सरकार स्थापन झाल्यापासून त्यांनी या क्षेत्रावर लक्ष केंद्रित केलं आहे. शेतकऱ्यांचं सक्षमीकरण आणि विकासाकरता गेल्या सहा वर्षात सरकारनं अनेक पावलं उचलली. २ हजार २२ पर्यंत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं सरकारचं उद्दिष्टं आहे. त्यासाठी प्रधानमंत्री किसान सम्मान निधी- पीएम किसान, ई- नाम, प्रधानमंत्री फलसल बिमा योजना, प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना इत्यादी योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळत आहे. उत्पादन ते पणन यातल्या प्रत्येक बाबीवर सरकार लक्ष देत आहे. कृषी क्षेत्रासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद २ हजार १४ पूर्वी सुमारे **पंचविस**शे ३० हजार कोटी रुपये असायची, ती या सरकारनं दीड लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवली. पीएम किसान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना थेट लाभ हस्तातरणाद्वारे ७५ हजार कोटी रुपये दिले जात आहेत. दहा हजार **FPO** अर्थात शेतकरी उत्पादक संघटना स्थापन केल्या असून त्यांना सरकार सर्वतोपरी सहाय्य करत आहे. सर्व शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोचवून त्यांना जागतिक मूल्य साखळीत अधिक सक्षम बनवण्यावर सरकारचा भर आहे.

<><><><>

देशात आतापर्यंत कोरोना संक्रमणातून बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या १२ लाख ३० हजार ५०९ झाली आहे. ही संख्या सध्या कोरोना संक्रमणावर उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या संख्येपेक्षा दुप्पट आहे. सध्या देशात पाच लाख ८६ हजार २९८ रूग्ण उपचार घेत आहेत. दरम्यान, देशात गेल्या २४ तासात देशात कोविड १९ चे एकूण ५२ हजार ५० नवे रूग्ण आढळले, तर ४४ हजार ३०६ रुग्ण बरे झाले असल्याची माहिती आरोग्य मंत्रालयाकडून **दिली.** देशात सध्या या विषाणूने बाधित रुग्णांची एकूण संख्या १८ लाख ५५ हजार ७४५ झाली आहे.

देशात गेल्या २४ तासांत कोविड १९ च्या सहा लाख ६१ हजार ८९२ नमून्यांची चाचणी **झाली.** ही संख्या आतापर्यंत केलेल्या चाचण्यांच्या संख्येपैकी सर्वात जास्त आहे. आतापर्यंत देशात कोविड-१९ च्या दोन कोटी आठ लाख ६४ हजार चाचण्या **झाल्या** आहेत. सध्या देशात या चाचण्यांसाठी एक हजार ३५६ प्रयोगशाळा असून, यापैकी ९१७ प्रयोगशाळा सरकारी तर ४३९ प्रयोगशाळा खाजगी असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><>

राज्यात काल **10** हजार **221** रुग्ण कोरोना**मु**क्त होऊन घरी गेले. राज्यात आतापर्यंत कोरोनाचे **2** लाख **87** हजार **20** रुग्ण बरे झाले असून बरे होण्याचं प्रमाण **63** पूर्णांक **76** शतांश टक्के आहे, तर **8** हजार **969** नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले. काल दिवसभरात आढळलेल्या नव्या कोरोना बाधितांपेक्षा उपचारानंतर बरे होऊन घरी गेलेल्या रुग्णांची संख्या जास्त आहे. राज्यात आतापर्यंत एकंदर **4** लाख **50** हजार **196** कोरोना बाधित आढळले असले तरी सध्या **1** लाख **47** हजार **18** रुग्णांवरच विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. काल कोविड **19** च्या **266** रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाल्यामुळे आतापर्यंत राज्यात या रोगामुळे दगावलेल्यांची संख्या **15** हजार **842** झाली आहे. राज्यात सध्या **9** लाख **25** हजार **269** जण घरी, तर **37** हजार **944** जण संस्थात्मक विलगीकरणात आहेत. राज्याचा मृत्यूदर **3** पूर्णांक **52** शतांश टक्के इतका आहे.

<><><><>

**औरंगाबाद** जिल्ह्यात आज सकाळी ९८ नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले. यात महानगतरपालिका हद्दीतल्या ३६ तर ग्रामीण भागातल्या ६२ रुग्णांचा समावेश आहे. जिल्ह्यात आता कोरोनाबाधित रुग्णांची एकूण संख्या चौदा हजार ९९२ झाली आहे. यापैकी अकरा हजार २२९ रुग्ण बरे झाले आहेत तर ४८७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सध्या तीन हजार २७६ रुग्णांवर उपचार सुरू असल्याचं जिल्हा प्रशासनानं कळवलं आहे.

**अहमदनगर** जिल्ह्यात काल ३४० रूग्ण कोरोना मुक्त झाले. त्यामुळे घरी सोडण्यात आलेल्या रूग्णांची संख्या ४ हजार ३६५ झाली आहे. जिल्ह्यातली एकूण रूग्ण संख्या: ६ हजार ३६८ झाली आहे. जिल्ह्यातल्या मृतांची संख्या **78** झाली आहे. तर, १ हजार ९२५ रूग्णांवर उपचार सुरु आहेत.

**गडचिरोली** जिल्ह्यात आतापर्यंत **498** रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. काल २४ जणांना कोरोनाची लागण झाली. त्यामुळे जिल्ह्यात एकूण कोरोनाबाधितांची संख्या ६३१ वर पोचली असून, १३२ रुग्णांवर उपचार सुरु आहेत.

**सांगली** जिल्हा कारागृहात आणखी **22** जणांना कोरोना**बाधित झाले** आहेत. आतापर्यंत सांगली कारागृहात एकूण **85** जण कोरोनाबाधीत आहेत. यात **82** कैदी आणि **3** कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आता कोरोनाबाधित कैद्यांना सांगलीतील एका महाविद्यालयात अलगीकरण केंद्रात ठेवलं आहे.

**सातारा** जिल्ह्यात काल **90** रुग्ण बरे झाले. आतापर्यंत एकूण **22** हजार **181** रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. काल **48** रुग्णांचे अहवाल पॉझिटिव्ह आले त्यामुळे जिल्ह्यातला कोरोनाबधितांचा एकूण आकडा **4** हजार **561** झाला आहे. आतापर्यंत जिल्ह्यात एकूण **139** रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. तर, **2** हजार **204** रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

**नाशिक** जिल्ह्यात काल २०८ रूग्णांनी कोरोनावर मात केली आहे. काल एक हजार १८ नवीन कोरोना बाधीत रुग्ण आढळले आहेत. एका दिवसात आढळलेली ही आत्तापर्यंतची सर्वात मोठी संख्या आहे. काल **11** रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

**यवतमाळ** जिल्ह्यात आतापर्यंत **730** रुग्ण कोरोनामुक्त झाल्यामुळे त्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. काल **9** नवीन पॉझीटिव्ह रुग्णांची भर पडली. कोरोनाबाधित रुग्णांच्या मृत्युमध्ये तीन जणांची भर पडल्यानं आतापर्यंत रुग्णांचा आकडा **1** हजार **226** वर पोचला आहे. तर, एकूण मृत्युची संख्या **32** झाली आहे. **126** रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

**वाशिम** जिल्ह्यात काल **28** रुग्णांनी कोरोनावर मात केली. आतापर्यंत **448** रुग्णांना उफचारा नंतर घरी पाठवलं आहे. तर काल एकाच दिवशी **92** नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले एकाच दिवशी एवढ्या मोठया प्रमाणात रुग्ण आढळण्याची जिल्ह्यातील ही पहिलीच वेळ होय. दरम्यान काल एका **32** वर्षीय महिलेचा **उपचारादरम्यान** मृत्यू झाला.

**नांदेड** जिल्ह्यात काल **66** रुग्ण कोरोनामुक्त झाले आतापर्यंत एकुण **1** हजार **20** रुग्ण बरे झाले आहेत. काल २०३ कोरोनाबाधीत रूग्ण आढळले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातली एकुण रूग्णसंखा **2** हजार **359** बाधीत झाले आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात ए**कूण** **94** रुग्णांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे तर **1** हजार **232** रूग्ण विविध रूग्णालयात उपचार घेत आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय लोकसेवा आयोगानं, नागरी सेवा परीक्षा २०१९ चे अंतिम निकाल आज जाहीर केले. नागरी सेवांच्या एकूण ९२७ पदांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. निकालानंतर भारतीय प्रशासकीय, परराष्ट्र व्यवहार, आणि भारतीय पोलीस सेवेतल्या विविध पदांसाठी एकूण ८२९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. या निकालात मुलांमधे प्रदीप सिंग यानं, तर मुलींमधे प्रतिभा वर्मा हीनं पहिला क्रमांक पटकावला आहे. हा निकाल केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येईल. निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांनंतर गुण जाहीर केले जातील अशी माहिती केंद्रीय लोकसेवा आयोगानं दिली आहे.

**//<><><><><>//**